# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १९/०२/२०२५ (बुधवार) दुपार**

---

### गेम पार्लर वर धाड, खापरखेडा पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :—दिनांक १८/०२/२५ रोजी खापरखेडा पोलीस अवैधधंदयावर कारवाई करणेकामी वलनी बीट परीसरात पेट्रोलींग करीत असतांना पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की पिपळा डाक बंगला येथील बाजार चौकात काही इसम गेम पार्लरमध्ये मशीन (खटखट) वर पैसे देवुन आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा पिपळा, डाग बंगला, मटन मार्केट येथे धाड टाकली असता १) एक इसम काउंटवर बसुन दिसला तसेच काही इसम मशिनवर जुगार खेळतांना दिसले. मशिन चालक आरोपी क्र.१) अनिल शिवदयाल उईके, वय ३० वर्षे, रा खापरखेडा. याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले. अरोपी क्र २) अमोल रमेश निर्मळ, वय ३२ वर्षे, रा खापा पाटन ३)सुहास मनोहर काशीकर, वय ३० वर्षे, रा खापा पाटण ४) रुपेश वसंतरावजी कडक, वय २९, वर्षे, रा पिपळा डाग बंगला ५) रितेश किशोर मादरवार, वय ३० वर्षे ,रा वलनी कॉलनी ६) सचिन गौतम कोटगले, वय ३२ वर्षे, रा खापा पाटण ७)मुकेश प्रेमा कनोजे, वय २३ वर्षे, रा पिपळा डागबंगला ८) मुकुंदा मनिराम बिगाने, वय ३८ वर्षे, रा पिपळा डागबंगला ९) गणेश हरीभाउ उईके ,वय ३५ वर्षे, रा कवडस १०) हेमराज रातप्रकाश गोस्वामी, वय ३८ वर्षे, रा वलनी हे मशिन वर जुगार खेळतांना मिळुन आले. अरोपीतांच्या ताब्यातुन रोख रक्कम ४,२६५/— रूपये, खटखट मशीन एकुण ९ किमती १८,००,००/—रूपये, लिनोआ कंपनीचे चे तीन सीपीयु किमती ३०,०००/—रूपये, एचपी कंपनी चे तीन मॉनीटर किंमती १५,०००/—रूपये, कीबोर्ड —०५ किमती ३,०००/—रूपये, माउस — ०६ किमती ९००/—रूपये, चार्जर —०३ किमती. ३,०००/—रूपये,कनेक्टर — ९ कि. १८,०००/—रूपये असा एकुण २,३७,९६५/—रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

**नमुद १० आरोपीतांविरूध्द पोलीस स्टेशन खापरखेडा येथे** कलम ४,५ मजुका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर